RNI No. MAHBIL /2009/31732

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष १, अंक १५] गुरुवार ते बुधवार, मे २८-जून ३, २०१५/ज्येष्ठ ७-१३, शके १९३७ [पृष्ठे ८

[किंमत : रुपये ९.००]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक आरोग्य विभाग

जी. टी. रुग्णालय आवार, १० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक १५ मे २०१५

### अधिसूचना

**गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४.**

क्रमांक प्रचिनि.२०१२/प्र. क्र. ७८/कु.क.— गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ (१९९४ चा ५७) (यापुढे उक्त अधिनियम असे उल्लेखिलेला) मधील कलम १७ च्या पोट-कलम (२) आणि (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून तसेच त्याबाबत सहाय्यभूत करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून आणि सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन अधिसूचना क्रमांक (१) प्रचिनि-१०९७/६३०/प्र. क्र. १४०/कु.क. ३, दिनांक ११ सप्टेंबर १९९७ ; (२) प्रचिनि-१०९७/६३०/प्र. क्र. १४०/कु.क. ३, दिनांक ९ डिसेंबर १९९७ ; (३) प्रचिनि-२००१/१५४५/प्र. क्र. ३४९/कु.क. ३, दिनांक ६ नोव्हेंबर २००१ ; (४) प्रचिनि-२००१/१५४५/प्र. क्र. ३४९/कु.क. ३, दिनांक २७ डिसेंबर २००१ ; (५) प्रचिनि-१०९९/प्र. क्र. २९२/कु.क. ३, दिनांक ९ जानेवारी २००२ ; (६) प्रचिनि-२००६/१९७/प्र. क्र. १९/कु.क. २, दिनांक १५ मे २००६ ; (७) प्रचिनि-२००७/५२५/प्र. क्र. १३३/कु.क. २, दिनांक ९ मे २००७ ; (८) प्रचिनि-२००७/५२५/प्र. क्र. १३३ (भाग-३)/कु.क. २, दिनांक १६ ऑक्टोबर २००७ ; (९) प्रचिनि-२००८/९७१/प्र. क्र. २७३/कु.क. २, दिनांक २ एप्रिल २००९ अधिक्रमित करून खालील तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या स्तराकरिता व स्तंभ (४) नुसार वाटप केलेल्या कार्यक्षेत्राकरिता शासन, स्तंभ (२) मध्ये समावेश असलेल्या सदस्यांची समुचित प्राधिकारी म्हणून खालीलप्रमाणे नियुक्ती करीत आहे :—

**तक्ता**

| अ. क्र. (१) | समुचित प्राधिकारी (२) | स्तर (३) | कार्यक्षेत्र (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक. | जिल्हा | जिल्हा (महानगरपालिका, नगरपालिका वगळून) |
| २ | तहसीलदार, नायब तहसीलदार, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/कुटीर रुग्णालय. | तालुका | तालुका/ग्रामीण/उपजिल्हा/सामान्य/कुटीर रुग्णालयाचे कार्यक्षेत्र. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका उपायुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी (प्रभाग निहाय). | महानगरपालिका | संबंधित महानगरपालिका छावणीसह (छावणी असल्यास)/संबंधित प्रभाग. |
| ४ | मुख्याधिकारी | नगरपालिका | संबंधित नगरपालिका |
| ५ | उप संचालक, आरोग्य सेवा | विभागीय | संबंधित आरोग्य परिमंडळ |
| ६ | कार्यकारी आरोग्य अधिकारी, सह कार्यकारी आरोग्य अधिकारी, उप कार्यकारी आरोग्य अधिकारी, विशेष अधिकारी (कु.क.), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्रभाग सर्व. | बृहन्मुंबई महानगरपालिका | बृहन्मुंबई महानगरपालिका/संबंधित प्रभाग |
| ७ | वैद्यकीय संचालक, सहायक आयुक्त. | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका. | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका |
| ८ | वैद्यकीय अधीक्षक | नाशिक महानगरपालिका. | नाशिक महानगरपालिका |
| ९ | सहायक आरोग्य प्रमुख | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका. |

उक्त अधिनियमातील कलम १७ (४) मधील ($a$) नुसार जनुकीय समुपदेशन केंद्र, जनुकीय प्रयोगशाळा, जनुकीय चिकित्सा केंद्रांना मान्यता देणे, बरखास्त करणे किंवा नोंदणी रद्द करणे हे अधिकार जिल्हा/महानगरपालिकास्तरावरील वैद्यकीय समुचित प्राधिकारी यांना असतील.

समुचित प्राधिकारी उक्त अधिनियमात नमूद केलेली उर्वरित कार्ये पार पाडतील. जुन्या प्रकरणी (असल्यास) ज्या समुचित प्राधिकाऱ्यांनी प्रकरणे दाखल केली असतील तेच समुचित प्राधिकारी पुढील कार्यवाही करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज्ञा. ल. सुळ,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

G. T. Hospital, Complex Building, 10th Floor,
Mantralaya, Mumbai 400 001, dated 15th May 2015.

*NOTIFICATION*

PRE-CONCEPTION & PRE-NATAL DIAGNOSTIC TECHNIQUES (PROHIBITION OF SEX SELECTION) ACT, 1994.

No. PRACHINI.2012/CR-78/FW.—In exercise of the powers conferred by sub-sections (*2*) read with (*3*) of section 17 of the Pre-conception and Pre-natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994 (57 of 1994) (hereinafter referred to as "the said Act") and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of the Government notifications, Public Health Department, bearing (*i*) No. Prachini-1097/630/C.R. 140/F.W.III, dated the 11th September 1997 ; (*ii*) No. Prachini-1097/630/C.R. 140/F.W.III, dated the 9th December 1997 ; (*iii*) No. Prachini-2001/1545/C.R. 349/F.W.III, dated the 6th November 2001 ; (*iv*) No. Prachini-2001/1545/C.R. 349/F.W.III, dated the 27th December 2001 ; (*v*) No. Prachini-1099/C.R. 292/F.W.III, dated the 9th January 2002 ; (*vi*) No. Prachini-2006/197/C.R. 19/F.W.II, dated the 15th May 2006 ; (*vii*) No. Prachini-2007/525/C.R. 133/F.W.II, dated the 9th May 2007 ; (*viii*) No. Prachini-2007/525/C.R. 133 (part-II)/F.W.II, dated the 16th October 2007 ; (*ix*) No. Prachini-2008/971/C.R. 273/F.W.II, dated the 2nd April 2009 ; the Government of Maharashtra is hereby pleased to appoint an Appropriate Authorities consisting of the members mentioned in column (2) in respect of the level specified against each of them in column (3) and allocates among each of them the area mentioned in column (4) of the Table appended below :—

TABLE

| Sr. No. (1) | Appropriate Authority (2) | Level (3) | Allocated Area (4) |
|---|---|---|---|
| 1 | Collector, Addl. Collector, Civil Surgeon. | District | Whole District (Excluding Municipal Corporation and Municipal Councils). |
| 2 | Tahasildar, Nayab Tahasildar, Medical Superintendents, Rural Hospital/Sub-District Hospital/ General/Cottage Hospital. | Taluka | Taluka/Area allocated to Rural Hospital/Sub-District Hospital/ General/Cottage Hospital. |
| 3 | Municipal Commissioner, Deputy Municipal Commissioner, Medical Health Officer (Wardwise). | Municipal Corporation. | Concern Municipal Corporation and Contonment Board (if any) Concern Ward. |
| 4 | Chief Officer | Municipal Council. | Concern Municipal Councils |
| 5 | Deputy Director, Health Service | Regional | Concern Health in Charge Circle |
| 6 | Executive Health Officer, Joint Executive Health Officer, Deputy Executive Health Officer, Special Officer (F.W.), Medical Officers of Health of all Wards. | Greater Mumbai Municipal Corporation. | Greater Mumbai Municipal Corporation/Concern Ward. |
| 7 | Medical Director, Assistant Commissioners. | Pimpri Chinchwad Municipal Corporation. | Pimpri Chinchwad Municipal Corporation. |

TABLE—Contd.

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| 8 | Medical Superintendent | Nashik Municipal Corporation. | Nashik Corporation |
| 9 | Assistant Medical Officer of Health | Pune Municipal Corporation. | Pune Municipal Corporation |

2. The Government of Maharashtra further directs that, the function provided under clause (*a*) of sub-section (*4*) of section 17 of the said Act, to grant, suspend or cancel registration of a Genetic Counselling Centre, Genetic Laboratory of Genetic Clinic Vest only with the Medical Appropriate Authorities of the District or Corporation, as the case may be.

The Appropriate Authority shall perform the other functions mentioned in the said Act. Old cases (if any) pending on the date of publication of the said notification shall be dealt by the concerned authorities.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. L. SUL,
Deputy Secretary to Government.

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जी. टी. रुग्णालय आवार, १० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक १५ मे २०१५

## अधिसूचना

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्रमांक जमृनों. २००८/७५/प्र. क्र. २४/कु.क. २.— जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) याच्या कलम ३० च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) आणि कलम १४ द्वारे प्रदान कलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन केंद्र सरकारच्या मान्यतेने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० मध्ये याद्वारे खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम, २०१५ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या नियम १० मधील पोट-नियम (१) च्या परंतुकामध्ये " (एक) जर त्यांची नोंदणी " या वाक्यापासून सुरू होणाऱ्या व " अधीन राहून निबंधक " या वाक्याच्या ठिकाणी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर बदली दाखल करण्यात येईल :—

" (एक) जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी जर नोंदणी केली असेल तर महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करण्याच्या वेळी ज्या प्रकरणांना पंधरा वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा प्रकरणांसाठी आणखी पाच वर्षांचा कालावधी देण्यात येईल किंवा (दोन) महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (दुसरी सुधारणा) नियम, २०१५ च्या प्रारंभाच्या दिनांकानंतर जर नोंदणी केली असेल तर कलम २३ च्या पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीन राहून अशा नोंदणीच्या दिनांकापासून निबंधक ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज्ञा. ल. सुळ,**
शासनाचे उप सचिव.

**PUBLIC HEALTH DEPARTMENT**

G. T. Hospital Complex Building, 10th Floor,
Mantralaya, Mumbai 400 001, dated 15th May 2015

*NOTIFICATION*

Registration of Birth and Death Act, 1969.

No. Jamruno. 2008/75/C.R. 24/F.W. 2.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*2*) of section 30 read with section 14 of the Registration of Birth and Death Act, 1969 (18 of 1969), the Government of Maharashtra with the approval of Central Government, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Registration of Births and Deaths, (2nd Amendment) Rules, 2015.

2. In rule 10 of the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000 in sub-rule (1), in the proviso, for the portion beginning with the words " which shall be reckoned " and ending with the words " the Registrar shall,-" the following shall be substituted, as follows, name :—

" which shall be reckoned,—

(I) in case where the registration has been made prior to the date of commencement of the Registration of Births and Deaths Rules, 2000, further five years period shall be given, in respect of those cases, where fifteen years period has been completed at the time of publication of the Maharashtra Registration of Births and Deaths (2nd Amendment) Rules, 2015, or

(II) in case where the registration is made after the date of commencement of the Maharashtra Registration of Births and Deaths (2nd Amendment) Rules, 2015, from the date of such registration, subject to the provisions of sub-section (*4*) of section 23, and the Registrar shall, ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. L. SUL,
Deputy Secretary to Government.

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ मे २०१५

## अधिसूचना

**मोटार वाहन अधिनियम, १९८८.**

क्रमांक एमसीटी.२०१५/८९/प्र.क्र. ४८/परिवहन-५.—ज्याअर्थी, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम १६५ कलम (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मोटार वाहनांच्या वापरामुळे झालेल्या व्यक्तीचा मृत्यु किंवा त्यांना झालेली शारीरिक इजा किंवा त्यामुळे झालेल्या तिसऱ्या पक्षाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान किंवा दोन्हीही यांचा अंतर्भाव असणाऱ्या अपघाताच्या संबंधातील नुकसानभरपाईसाठीच्या दाव्यावर अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रासाठी एकूण आठ, नागपूर येथे एकूण चार, पुणे व ठाणे येथे प्रत्येकी एक अशी एकूण १४ मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे गठीत करण्यात आली आहेत.

त्याअर्थी, आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम १६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमान्वये महाराष्ट्र शासन याद्वारे श्री. किशोर दत्तात्रय वडाणे, जिल्हा न्यायाधीश-८ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश पुणे यांची सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, ठाणे येथे तसेच श्रीमती चंदाराणी मोतीलाल साळुंके, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अलिबाग, जिल्हा रायगड यांची सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई येथे आणि श्री. तन्वीर इक्बाल अहमद असिम मोहम्मद, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांची सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर येथे त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रकाश साबळे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st May 2015

*NOTIFICATION*

MOTOR VEHICLE ACT, 1988.

No. MCT.2015/89/C.R. 48/Transport-5.—Whereas, in exercise of the powers conferred by sub section (*1*) and (*2*) of section 165 of the Motor Vehicle Act, 1988 (59 of 1988), The Government of Maharashtra has constituted 8 Motor Accident Claims Tribunals for the area comprised within the limits of the Municipal Corporation of Brihan Mumbai, 4 Motor Accident Claims Tribunals for Nagpur and 1 Motor Accident Claims Tribunal at Pune and Thane each. Total number of Motor Accident Claims Tribubnals for the purpose of adjudicating upon the claims for compensation in respect of accident involving the death or bodily injury to person arising out of the use of motor vehicles of damages to any property of third party so arising of both.

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 165 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), and rules framed under this, the Government of Maharashtra hereby appoints Shri Kishor Dattatraya Vadane, District Judge-8 and Additional Sessions Judge, Pune as Member, Motor Accident Claims Tribunal, Thane as well as Smt. Chandarani Motilal Salunke, *Ad-hoc* District Judge-1 and Additional Sessions Judge, Raigad at Alibag as Member, Motor Accident Claims Tribunal, Mumbai and Shri Tanvir Iqbal Ahmad Asim Mohammad, *Ad-hoc* District Judge-1 and Additional Sessions Judge, Yavatmal as Member, Motor Accident Claims Tribunal, Nagpur with effect from the date he assumes charge upto the age of 60 years or until further orders of Government whichever is earlier.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH SABALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.